अंबरनाथ

# अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जावक क्रमांक /अं.न.प./नरवि/बां.प./१६-१७/१९० ८६२४/१४

अंबरनाथ नगरपरिषद कार्यालय,

अंबरनाथ. दिनांक : १६/५/२०१६

वाचा :- मा. जिल्हाधिकारी , ठाणे यांचेकडील विनिश्चिती आदेश क्र

महसूल/क-१/टे-१४/विनिश्चिती/एसआर-५३/२०१५ दिनांक ३०/११/२०१५

सुधारित बांधकाम परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

प्रति,

श्री.बाळकृष्ण शंभु भोईर

द्वारा- श्री. सतीश डी. ओक, वास्तुशिल्पकार, बदलापूर

विषय : बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळणे बाबत

मौजे : चिखलोली, ता. अंबरनाथ येथील स.नं.१२६/१ क्षेत्र ३६४०.०० चौमी.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. अनप/नरवि/बांप/१५-१६/१६४५/८६०५/१९५ दि. २३/०३/२०१६

२) क्र. महसूल/क-१/टे-१४/विनिश्चिती /एसआर-५३/२०१५ दि. ३०/११/२०१५

३) आपला दि.१२/०४/२०१६ चा अर्ज क्र. ४६८२

महाशय,

उपरोक्त विषयांकित जागेमध्ये आपणास बांधकाम परवानगी संदर्भ क्र. १ अन्वये मंजूर करण्यात आली आहे. आता संदर्भ क्र. २ अन्वये इमारतीचे बांधकाम प्रारंभप्रमाणपत्र अपेक्षिलेले आहे. सबब आपणास कळविण्यात येते की, आपण वरील मंजूर परवानगीतील शर्तीच्या पूर्ततेस अधिन राहून तसेच खालील अटीस अधिन राहून विंग C पूर्वीच्या मंजूरीप्रमाणे व प्रस्तावित विंग B तळमजला + आठ मजले (भाग) रहिवास इमारतीचे बांधकाम करण्यास अनुमती देण्यात येत असून , ज्योत्यापर्यंत बांधकाम पूर्ण करावे व त्यानंतर जोता तपासणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विकासनियंत्रण नियमावलीतील अपेंडिक्स " XII " नुसार अर्ज करावा. व अपेंडिक्स " XIII " नुसार जोता तपासणी प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच जोत्यावरील पुढील बांधकामास सुरवात करावी.

-: अटी :-

१. ही बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नूतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमाच्या व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२. नकाशात------------------- रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४. ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

५. बांधकाम सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल. जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.

६. भूखंडाचे हद्दीत सोडली मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करू नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये.

७. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.

८. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची हमी (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.

९. बांधकाम पुर्णतेचा दाखला / वापर परवानगी घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करू नये त्यासाठी जागेवर ज्याप्रमाणे बांधकाम पूर्ण झाले आहे त्याचा नकाशा वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांच्या विहीत नमुन्यातील दाखल्यासह (५ प्रतीत) इतर आवश्यक कागद पत्रासह सादर करण्यात यावा.

१०. बांधकाम चालु करण्यापूर्वी नगर भूमापन अधिकारी / भूमी अभिलेख खात्याकडून जागेची आखणी करून घेण्यात यावी आणि तसा दाखला नगरपरिषदेकडे सादर केल्यानंतर बांधकाम सुरु करावे.

११. नकाशात दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व त्याच्या वापरामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करू नये.

THE SEAL OF SUB-REGISTRAR * DIST. THANE *